जें खळांची व्यंकटी सांडो | तया सत्कर्मी रती वाढो |
भूतां परस्परे पडो |

# मैत्र

जीवाचें ||



बाल्टिमोर मराठी मंडळ

वर्ष २०२३ अंक ४

**मैत्र संपादक मंडळ २०२३**

**वरदा वैद्य**
**विदुला कोल्हटकर**
**रोहित कोल्हटकर**
**मधुर पुरोहित**
**कपिल धाकड**
**दीप्ती जोशी**

**बाममं कार्यकारिणी २०२३**

अध्यक्ष – **अनीश पाटील**
उपाध्यक्ष – **सम्राज्ञी शिंदे**
उपाध्यक्ष (विपणन) – **पंकज शिवपुजे**
चिटणीस – **केतन शहापुरे**
खजिनदार – **योगेश खैरनार**
सह-खजिनदार – **स्मितेश लोकरे**
मुलांच्या कार्यक्रमांचे आयोजन– **वैशाली खैरनार**
ज्येष्ठ नागरिकांच्या कार्यक्रमांचे आयोजन– **सुषमा भोसले**
बृहन्महाराष्ट्र मंडळ प्रतिनिधी – **राजेंद्र मोडक**


## संपादकीय

या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिता

नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ||

नमस्कार मंडळी,

आसुरी शक्तींचा नाश करणाऱ्या देवीचे स्मरण करत मैत्रच्या ह्यावर्षीचा शेवटचा अंक तुमच्या हाती सोपवताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. तुम्ही सगळ्यांनी नवरात्रीचा उत्सव जोरदार साजरा केला असेलच. ह्यावर्षी अधिक श्रावण असल्यामुळे गणपती उशिरा आले आणि त्यानंतर लगेच नवरात्र आल्यामुळे गेल्या महिनाभर मराठी घरांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. भरीस भर म्हणजे भारतीय क्रिकेट संघाची विश्वचषक स्पर्धेमध्ये अश्वमेध यज्ञातील न थांबणाऱ्या घोड्याप्रमाणे घोडदौड चालू आहे. किवींच्या संघावर मात करून भारतीय संघाने न्यूझीलंडला हरवण्याचा २० वर्षांचा दुष्काळ संपवला आणि आपला आवडता भारतीय संघ उपांत्य फेरीच्या उंबरठ्यावर जाऊन पोहोचला. २०११ ची पुनरावृत्ती करत भारत पुन्हा एकदा विश्वचषक जिंकेल आणि सर्व भारतीयांना दिवाळीची छानशी भेट मिळेल अशी आशा करूया.

यंदाचा बाल्टिमोर मंडळाचा गणेशोत्सवाचा कार्यक्रम आयत्यावेळी राज्यपालांनी आपत्कालीन परिस्थिती जाहीर केल्यामुळे पुढे ढकलावा लागला आणि अनेकांचा विरस झाला. त्यातून कार्यक्रम तर रद्द झाला, मात्र नियोजित दिवशी पाऊस किंवा वादळ असे काहीच झाले नाही. त्यामुळे आणखीच हिरमोड झाला. अर्थात ह्या परिस्थितीत झटपट हालचाली करून, एका आठवड्यात नवीन जागा शोधून कार्यक्रम व्यवस्थितरित्या पार पाडल्याबद्दल आपल्या कार्यकारिणी समितीचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. ह्यावर्षीच्या भारताच्या यशस्वी चंद्रयान मोहिमेवर आधारित सजावट फारच छान होती. गणपतीच्या कार्यक्रमाच्या वेळी होणाऱ्या आवर्तन ह्या ढोल-ताशा समूहाचा जोर वर्षागणिक वाढतच चालला आहे. ह्या समूहाची दोन-तीन महिने जोरदार तयारी चालू असते. अर्थातच त्यांनी कसून केलेल्या मेहनतीमुळे आपल्याला आपल्या गावातील गणपती मिरवणुकीची आठवण आल्यावाचून राहात नाही. त्याबद्दल त्या सर्वांचे मनापासून आभार. गणपती बाप्पा मोरया !!

दसरा झाल्यावर एका आठवड्यात हॅलोविन आणि म्हणता म्हणता दिवाळी येईलच. आपल्या मंडळाने ह्यावर्षीच्या दिवाळीच्या कार्यक्रमाची तारीख जाहीर केलेली आहे. नोव्हेंबर १८ला दिवाळीचा कार्यक्रम असणार आहे. त्यावेळी अनेकांशी प्रत्यक्ष भेटी होतील. तुम्ही दिवाळीबद्दल, तुमचे घर कसे सजवता त्याबद्दल लेख किंवा सजावटीचे फोटो, फराळ करतानाच्या गमती जमती, अनुभव, पाककृती अशा गोष्टी आम्हाला पाठवायला विसरू नका.

दिवाळी आली की वर्ष संपत आल्याची चाहूल लागते आणि ह्या वर्षभराचा आढावा घेण्यास सुरुवात होते. कसे गेले हे वर्ष? काय काय केले? काय करणे बाकी आहे? पुढच्या वर्षीसाठी कोणते संकल्प करायचे वगैरे विचार सुरू होतात. मैत्र ह्या आपल्या

त्रैमासिकाचा आढावा घ्यायचा म्हटल्यास, ह्यावर्षी जवळपास ५० लेख/कविता प्रकाशित झाल्या. ह्यासाठी जवळपास ३० लेखक/लेखिकांनी त्यांचे साहित्य पाठवले. ह्या लेखकांमधील बरेचसे स्थानिक म्हणजेच अर्थात बाल्टिमोर किंवा आसपासच्या परिसरातील आहेत. एकूण लेखांमध्ये हलक्या फुलक्या गोष्टीपासून, ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्र ह्या विषयांवरचे माहितीपर लेख, भारतातील सद्य परिस्थितीच्या अनुषंगाने माहिती देणारे लेख प्रकाशित झाले. गेली दोन वर्षे चालू असलेल्या 'चित्रसाहित्य' सदराला पूर्णविराम मिळाला, पण त्याबरोबरच काही नवी सदरे (कवितेचं पान, पौराणिक कथा, भाषाविचार, भगवान विष्णूची २४ नावे) सुरू झाली. एक शतशब्द कथाही प्रकाशित झाली. मराठी कथा लिहिण्याची इच्छा आहे पण किती लिहावे ते काळात नाही अशांसाठी शतशब्द कथा लिहिण्याचा मार्ग सोपा ठरू शकतो. मैत्रासाठी लेखन पाठवल्याबद्दल सर्व लेखकांचे मनापासून आभार.

मैत्र ह्या मंडळाच्या मासिकाला पुनर्जीवित करून आता जवळपास ५ वर्ष पूर्ण होतील, म्हणजेच एकूण २० अंक आणि २५० पेक्षा अधिक लेख प्रकाशित झाले आहेत. संपादक मंडळाच्या पुढाकाराने बरीच सदरेही चालवली जात आहेत – गड्या आपुला गाव बरा, साहित्याची देवाणघेवाण, विशिष्ट विषयांवरील लेख, चित्रसाहित्य, भाषाविचार, बालविभाग, वगैरे सर्व साहित्य बाल्टिमोर मंडळाच्या संकेतस्थळावर (www.baltimoremarathimandal.org) उपलब्ध आहे. २०२० आणि नंतरचे सर्व साहित्य ब्लॉगस्वरूपातही (www.maitrabmm.blogspot.com) उपलब्ध आहे. हे काम गेली ५ वर्षे चालू असताना संपादक मंडळात मात्र फारसा बदल झालेला नाही. बरेचसे संपादक पहिल्यापासून (म्हणजे गेली ५ वर्षे) सातत्याने आणि आनंदाने हे काम करत आहेत आणि करत राहतील. पण तरीही तुमच्यापैकी कोणाला संपादक मंडळात सहभागी होण्याची इच्छा असेल तर आमचा आनंद द्विगुणित होईल. तेव्हा मैत्र संपादक मंडळामध्ये सहभागी होण्याबद्दल आम्हाला जरूर कळवा.

दर वेळेप्रमाणे ह्या अंकातसुद्धा विविध प्रकारच्या लेखांची रेलचेल आहे. वर्षाच्या सुरवातीला काही हिंसक घटनांमुळे चर्चेत आलेल्या मणिपूरबद्दल माहिती देणारा लेख, सैनिक टाकळी ह्या महाराष्ट्रातल्या गावाची माहिती देणारा लेख ह्या अंकात आहे. तसेच भारताच्या चंद्रयान मोहिमेमधून मिळालेल्या माहितीबद्दलचा लेख, नुकत्याच झालेल्या कंकणाकृती सूर्यग्रहणाबद्दलचा अनुभव ह्या अंकात वाचायला मिळेल. ह्याचबरोबर पौराणिक कथा, भगवान विष्णूची २४ नावे ह्या सदरांतर्गत लेखसुद्धा प्रकाशित करीत आहोत. ह्या अंकासाठी लेखन पाठवणाऱ्यांचे आभार. सदरांतर्गत भागांचे लेखन पाठवणाऱ्यांचेसुद्धा आभार. तुम्हाला एखाद्या विषयावर सदर चालवण्याची इच्छा असेल तर आम्हाला जरूर कळवा.

मैत्रचा पुढचा अंक पुढच्या वर्षी जानेवारी महिन्याअखेरीस प्रकाशित होईल. त्या अंकासाठी तुम्ही भरभरून साहित्य पाठवाल अशी आशा करतो. अंकासाठीचे साहित्य १५ जानेवारीपर्यंत editor@baltimoremarathimandal.org ह्या पत्त्यावर पाठवायचे आहे. नेहमीप्रमाणे कथा, कविता, लेख, अनुभव, पाककृती, कला/छायाचित्रे, छंद, प्रवासवर्णन, मुलाखत, वगैरे सर्व साहित्यप्रकारांचे स्वागतच आहे.

*'दिसामाजी काहीतरी लिहावे, प्रसंगी अखंडित वाचीत जावे'* ह्या समर्थ रामदासांच्या ओळींनी प्रेरित होऊन तुम्ही काहीतरी लिखाण कराल अशी आशा करतो. सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

कळावे,

संपादक मंडळ

# बाल्टिमोर मराठी मंडळ
# मैत्र

## ह्या अंकात –


**पौराणिक कथा** – भाग४ – बुध आणि इला – अवंती करंदीकर

**भगवान विष्णूंची २४ नावे** – भाग२ – सुधीर लिमये, प्रिया जोशी

**कलाचित्र** – गणपती बाप्पा मोरया – योगिनी दहिवदकर

**कथा/लेख/अनुभव**

- मणिपूर – ओंकार नातू
- दिवाळीची कथा – विदुला कोल्हटकर
- चंद्रस्पर्श – सायली अवचट
- अग्निकंकण – वरदा वैद्य
- मध्यमा – राजेंद्र मोडक
- अ...अमेरिकेचा...? – शुभदा जोशी–पारखी
- वीर जवानांचे गाव : सैनिक टाकळी – सुनील दादा पाटील



**मुखपृष्ठ** – 'कंकणाकृती सूर्यग्रहण '
छायाचित्रकार – डॉ. वायुजीत गोखले
यांनी १४ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या कंकणाकृती सूर्यग्रहणाचे हे छायाचित्र ब्लाण्डिंग, युटाह इथून टिपले.



ओंकार नातू

# मणिपूर

एप्रिल २०२३ पासून मणिपूर हा भारतातील उत्तरपूर्व (नॉर्थईस्ट) भाग सगळ्यांच्या चर्चेत आहे. अर्थात चर्चा करणारे सगळे तिकडे जाऊन आलेले नाहीत. काहींना तर एप्रिलमध्येच कळले तो भाग नकाशामध्ये कुठे आहे ते.  प्रथम आपण तिकडचा भूगोल आणि लोकसंख्या (डेमोग्राफी) जाणून घेऊ. मणिपूरमध्ये तीन मुख्य जमाती राहतात– मैतेई, कुकी, आणि नागा. त्यातील मैतेईंची लोकसंख्या ५३%,  कुकींची २४% आणि नागांची १६% आहे. मैतेई लोक दरी क्षेत्रात राहतात तर कुकी आणी नागा डोंगर आणि जंगल क्षेत्रात राहतात. ह्या जमातींदरम्यान गेल्या २० वर्षांहून अधिक काळ आरक्षणाबाबत वाद चालू आहेत. मैतेई लोक दरी क्षेत्रामध्ये राहत असल्यामुळे त्यांना अर्थातच पिके घेता येतात, शेती करता येते. त्यांना डोंगर भागात जागा घेता येईल असा आदेश न्यायालयाने जाहीर केला आहे.  डोंगर–जंगलामध्ये राहणाऱ्या समुदायाचा त्याला विरोध आहे. तोच विरोध आपल्याला पार हिंसक वाटेला घेऊन गेलेला दिसतो. जर आरक्षण रद्द झाले तर त्या समुदायाला राहायला घरे उरणार नाहीत आणि त्यांना स्थलांतरित व्हावे लागेल.

मणिपूर नकाशा




Photo - Shutterstock

आंदोलन किंवा विरोध शांततेने व्हावा आणि चर्चा करून मार्ग काढावा हा उपाय सर्वात सोपा असला तरी तो अंमलात आणायला अवघड असतो. मणिपूरचे आंदोलन एका क्षणात हिंसक झाले. एका समुदायाविरुद्ध दुसरा समुदाय त्यांची दले, लष्करे तयार करू लागला. सध्या त्यांचे लक्ष्य एकच आहे की आपले गाव वाचवायचे, पलीकडच्या समुदायाचे गाव जाळायचे, सगळ्यांना मारून टाकायचे आणि पूर्ण भागावर कब्जा करायचा. त्यासाठी प्रत्येक गावातले युवक, युवती हत्यारे घेऊन उभे आहेत.

इथे खूप वर्षांपासून अस्थिरता आहे. सरकारने हवे तेवढे लक्ष दिलेले नाही. म्यानमारला लागून असलेल्या सीमेमुळे हा भाग महत्त्वाचा आहे. ही गोष्ट साधारण २०१४ पासून सरकारला माहिती आहे. तिथे विकास व्हायला लागला आहे असे म्हणणे चुकीचे ठरेल, पण प्रगती नक्कीच होत आहे असे मला वाटते. अजूनही सरकारी नोकऱ्या उपलब्ध नाहीत. युवक/युवती जर थोडेफार शिकले तर ते शहरांत जातात, पण गाव मागेच राहते. जे राहतात त्यातले अनेक व्यसनी होतात आणि शस्त्रे घेऊन वाईट मार्गाला लागतात. डोंगरी भाग असल्याने अफूचे पीक पुष्कळ येते. राज्यसभेच्या २ जागा आहेत. त्या जागांवर मैतेईच निवडून येतात. एकूणच ह्या परिस्थितीसाठी अनेक कारणे आहेत.

पूर्ण जग/देश मणिपूरबद्दल बोलू लागला ते एका चित्रफितीमुळे (विडिओमुळे), सोशल मीडियामुळे. मग विडिओ कधीचा, कोण लोक होते, गृहमंत्र्याची भेट, वगैरे चर्चा सुरू झाल्या. या बाबतीत बातम्या कमी आणि अफवाच जास्त पसरू लागल्या. कोणी म्हणाले की सरकारने माफिया, अफू पीक असे बेकायदा धंदे बंद केले म्हणून असे चालू आहे, तर कोणी म्हणाले की सरकार

काहीच करत नाही किंवा, काहींच्या मते केंद्र आणि राज्यात एकाच पक्षाचे सरकार असूनही विकृत राजकारण चालू आहे. सध्या काय खरे आणि काय खोटे हे तिथे जाऊन बघितल्याशिवाय कळणार नाही आणि तिथे जाणे आत्ता तरी शक्य नाही.

मी ज्ञानप्रबोधिनी फाउंडेशन (JPF) आणि ज्ञानप्रबोधिनी (JP) संस्थांसाठी काम करतो. त्या भागात ज्ञानप्रबोधिनीचे काम अनेक वर्षांपासून चालू आहे. तिथे ३ शाळाही चालू आहेत. संस्थेचा मूळ उद्देश असा आहे की शिक्षण चांगले मिळाले की गाव,शहर, देश प्रगत होतो. त्यात राष्ट्रीय एकात्मता हाही एक संदर्भित (relevant) मुद्दा आहे. भारतातला ज्ञानप्रबोधिनीमधला एक दादा मणिपूर मधून १० मुले ज्ञानप्रबोधिनीमध्ये घेऊन आला. ही मुले आणताना प्रत्यक्ष घडलेल्या घटना त्याने सांगितल्या. त्यामुळे खरी परिस्थिती समजली. मुले इयत्ता ५ वी मधली आहेत. त्यांना चांगले शिक्षण देणे, राष्ट्रीय एकात्मता शिकवणे आणि भारताचा चांगला नागरिक घडवणे हा त्यामागचा हेतू आहे.

मुख्य म्हणजे एकात्मता भारतात सगळीकडे महत्त्वाची आहे. भारतात  पंजाब, मणिपूर, अरुणाचल, तामिळनाडू, काश्मीर असे अशांतता असलेले प्रदेश आहेत. आपली विविधतेमध्ये एकता (unity in diversity) जगात प्रसिद्ध आहे.  भारतात अनेक धर्म आहेत. सर्व भारतीय म्हणून राहण्याचा प्रयत्न नक्कीच करू शकतो. कुठलाच धर्म परिपूर्ण नाही. हिंदू धर्मातही जातपात आहेच. काही दिवसांपूर्वी कळाले की हिंदू धर्मात ३००० जाती आहेत. धर्म, जातपात करत बसलो तर असेच चित्र भारतभर दिसेल, जिथे अस्थिरता असेल, तिथे मतपेटीचे राजकारण केले जाईल, जो जिंकेल तो वाचेल आणि आपण ३००+वर्षे मागे जाऊ. मुद्दा हा आहे की, एकत्र राहण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता गरजेची आहे. हे जाणण्यासाठी शालेय जीवनापासून सुरुवात झाली पाहिजे. चांगले शिक्षणदेखील खूप महत्त्वाचे आहे. इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र हे तंत्रज्ञानाइतकेच महत्त्वाचे आहे.

सगळे जग भारतात यायला बघते आहे. आत्ता जर आपण एकत्र आलो नाही तर आलेली संधी गमावली असे होईल. ह्या सगळ्या आपल्याच लोकांना आपण भारतीय आहोत ही जाणीव करून द्यायला हवी. त्यांची मने जोडून घ्यायला हवीत. माझी संस्था –JPF/JP– अशा सर्व ठिकाणी अभ्यास दौरे काढणे, शाळा उभ्या करणे अशी महत्त्वाची कामे करते. तिथून आलेली दाही मुले एकदम हुशार आहेत. त्यांनी मराठीत अभंग म्हणून दाखवत अमेरिकेतील एका पाहुण्यांना आश्चर्याचा धक्का दिला. त्यांची फुटबॉलची (soccer) टीम सोलापूरमध्ये काही सामने जिंकली. त्यांना संगीताचीही आवड आहे. सध्या भाषेच्या मर्यादेमुळे ते सोलापूरला सेमी–इंग्लिश शाळेत शिकत आहेत. शाळेच्या तासांनंतर ते JP सोलापूरमध्ये क्रीडा, संगीत आणि राष्ट्रीय एकात्मतेबद्दल माहिती मिळवतात.  आपण भारत दौऱ्यावर गेलात तर त्यांना नक्की भेटा. सध्या गुरु पौर्णिमेपासून आम्ही 'LEARN  INDIA' अभियान सुरु केले आहे. त्यात आम्ही ह्या १० मुलांना शिक्षण, राहणे इत्यादिसाठी मदत करत आहोत. तुमची इच्छा असल्यास स्वयंसेवक म्हणून/आर्थिक देणगी देऊन तुम्हीही मदत करू शकता.



सायली अवचट

## चंद्रस्पर्श


२३ ऑगस्ट २०२३ रोजी, चंद्राच्या दक्षिण ध्रुवीय प्रदेशात यशस्वीपणे अंतराळ यान उतरवणारा भारत हा पहिला देश ठरला. सोव्हिएत समाजवादी प्रजासत्ताक संघ (पूर्वीचा रशिया), अमेरिका आणि चीननंतर अशाप्रकारे चंद्रावर पोहोचणारा भारत हा चौथा देश. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इसरो) चंद्रयान–३ (CH३) मोहिमेने चंद्राच्या पृष्ठभागावर सुमारे ७० अंश दक्षिणेकडील अक्षांशावर 'विक्रम' लँडर, त्यातील 'प्रज्ञान' या रोव्हरसहित, यशस्वीरित्या उतरविले. चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळील पृष्ठभागाच्या, इसरोच्याच चंद्रयान–२ (CH२) ऑर्बिटरवरील कॅमेराने काढलेल्या, आणि या लेखात जोडलेल्या, छायाचित्रामध्ये मध्यभागी विक्रम लँडर दिसत आहे. दक्षिण ध्रुवाजवळील अनेक विवरे आणि खड्ड्यांनी भरलेला चंद्राचा हा भाग विशेष संशोधनीय आहे. येथील काही विवरे कायमस्वरूपी अंधारात (permanently shadowed regions/PSRs) असल्याचे आढळून आले आहे, आणि त्यामुळे तिथे पाणी बर्फस्वरूपात उपलब्ध असण्याची शक्यता आहे. चंद्रावरील पाण्याच्या संभाव्य उपस्थितीचा भविष्यातील अंतराळप्रवास आणि संशोधनासाठी मोठा उपयोग होऊ शकतो.

चंद्रयान हे भारताच्या अंतराळ मोहिमांच्या मालिकेचे नाव आहे. उद्देश आहे अर्थातच चंद्राचे संशोधन. या मोहिमेतील पहिले, चंद्रयान–१ (CH१), हे २००९ मध्ये प्रक्षेपित करण्यात आले होते. CH१ बरोबर NASA चा Moon Minerology Mapper (M३) चंद्रावर पाठवण्यात आला होता. याद्वारे, चंद्राच्या पृष्ठभागावर असलेल्या खनिज स्वरूपातील पाण्याच्या रेणूंचा अभ्यास करण्यामध्ये आणि शोध लावण्यामध्ये CH१ चा मोठा सहभाग होता. त्यानंतर, २०१९ मध्ये CH२ या मोहिमेद्वारे इसरोने सर्वप्रथम चंद्रावर यान उतरविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पृष्ठभागाजवळ पोहोचताना यानाचा वेग नियंत्रित करण्यामध्ये तंत्रज्ञांना अपयश आल्याने लँडर चंद्रावर आदळले. परंतु, CH२ चा ऑर्बिटर अचूकपणे काम करीत राहिला आणि त्यावरील शास्त्रीय उपकरणे चंद्राच्या PSRs मधील पाण्याचे प्रमाण आणि वितरण यांचा सखोल अभ्यास करण्यात यशस्वी झाली. CH२ ऑर्बिटरवरील ड्युअल फ्रिक्वेन्सी सिंथेटिक अपर्चर रडारने (DFSAR) ध्रुवीय निरीक्षणांमधून चंद्राच्या पृष्ठभागावर असलेल्या बर्फ स्वरूपातील पाण्याची असंदिग्ध ग्वाही दिली.

CH२ प्रमाणेच CH३ चे प्राथमिक उद्दिष्ट यानाचे यशस्वी लँडिंग आणि भारताची प्रक्षेपणापासून लँडिंगपर्यंतची अंततः क्षमता प्रस्थापित करणे हे होते, तसेच चंद्राच्या वातावरणाचा अभ्यास करणे आणि CH१ आणि CH२ च्या चंद्रावरील खनिजशास्त्र आणि रसायनशास्त्राच्या निरीक्षणांवर आधारित पुढील अभ्यास करणे, हेही होते. त्यानुसार CH३ वरील अल्फा पार्टिकल एक्स–रे स्पेक्ट्रोमीटर (APXS) आणि लेझर इंड्यूस्ड ब्रेकडाउन स्पेक्ट्रोस्कोप (LIBS) वापरून, प्रज्ञान रोव्हरने दक्षिण ध्रुव परिसराच्या मूलभूत रचनेचा अभ्यास केला. चंद्राच्या ध्रुवीय भागांत १५ दिवस उजेड (चंद्रीय दिवस) आणि १५ दिवस अंधार (चंद्रीय रात्र) अशी परिस्थिती असते. यामुळे, चंद्राच्या ध्रुवांवरील रात्रीचे तापमान उणे २०० सेल्सिअस पेक्षा कमी आणि दिवसा ५५ सेल्सिअस च्या वर जाऊ शकते. तापमानांतील इतक्या प्रचंड तफावतीमुळे, यानाच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांवर परिणाम होऊ शकतो. या कारणाने CH३ च्या सुरुवातीच्या नियोजनानुसार, प्रज्ञान रोव्हरचे जीवनमान केवळ १४–१५ दिवस असणार होते. त्यानंतर विक्रम आणि प्रज्ञानवरील उपकरणे निद्रिस्तावस्थेमध्ये जाणार होती. सुरुवातीच्या १५ दिवसांत प्रज्ञानने चंद्रावरील भूकंप, उल्कापातांमुळे होणारे परिणाम, तसेच विक्रमच्या हालचालींमुळे चंद्राच्या पृष्ठभागावर निर्माण होणाऱ्या कंपनांचा अभ्यास केला.

प्रज्ञानने चंद्राच्या पृष्ठभागावरील प्लास्मा वातावरणाचे तसेच पृष्ठभागाच्या १० सेंटिमीटर खालील तापमानाचे देखील विश्लेषण केले. या अभ्यासाच्या  प्राथमिक निकालांनुसार चंद्राच्या पृष्ठभागावर लोह, अल्युमिनियम, कॅल्शियम, टायटेनियम याचबरोबर अनपेक्षितपणे मोठ्या प्रमाणात सल्फर आढळून आले आहे. सल्फरची उपस्थिती जरी नवीन नसली, तरी त्याचे आढळून आलेले प्रमाण हे ग्रहशास्त्रज्ञांननुसार (Planetary Scientists) भविष्यातील मानवी अंतराळ सफरींसाठी मोठेच वरदान आहे. याशिवाय, पृष्ठभागावर सापडलेल्या वेगवेगळ्या घटकांच्या प्रमाणांवरून शास्त्रज्ञांना चंद्राच्या उत्पत्तीबद्दल महत्त्वपूर्ण माहितीही मिळू शकेल. सल्फरचे पृष्ठभागावरील प्रमाण निश्चित करण्यामध्ये पुढील काही महिन्यांत शास्त्रज्ञांना यश येईल अशी अपेक्षा आहे.

प्रज्ञानच्या कार्यकाळात ते विक्रमपासून साधारण १०० मीटर अंतरामध्ये फिरत होते. विक्रम लँडरकडे परतून येताना प्रज्ञानने काढलेले त्याचे छायाचित्र खाली जोडले आहे. आपल्या एकमेव नैसर्गिक उपग्रहाची सारासार रचना समजून घेण्यासाठी घेतल्या गेलेल्या अनेक छोट्या पण सातत्यपूर्ण पावलांचे सुंदर प्रतिनिधित्व करणारी ही प्रतिमा आहे.








वरदा वैद्य

## अग्निकंकण

१४ ऑक्टोबर २०२३ ला होणारं कंकणाकृती सूर्यग्रहण अमेरिकेतून दिसणार आहे ह्याचा सुगावा आम्हाला लागताच ते बघायला जाण्याचं आम्ही नक्की केलं. कंकणाकृती सूर्यग्रहण तसं पाहता फार दुर्मिळ नसलं आणि दर वर्षा दोन वर्षातून एकदा तरी ते घडत असलं तरी ते आपल्या आसपास, आपल्याला सहज जाता येईल अशा ठिकाणांहून दिसायला हवं. अमेरिकेतून दिसू शकेल असं पुढचं कंकणाकृती सूर्यग्रहण असणार आहे जून २०३९ मध्ये. तेव्हाचं कोणी पाहिलं आहे? त्यामुळे आत्ता संधी चालून आली आहे तर ती न चुकवणं क्रमप्राप्तच होतं. हे सूर्यग्रहण अमेरिकेच्या वायव्य (उत्तर–पश्चिम), मध्य आणि आणि दक्षिण भागांतून दिसणार होतं (खाली नकाशा पाहा). आम्ही ते पाहण्यासाठी टेक्ससमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. आमचे काही नातेवाईक तिथे असल्यामुळे ग्रहणाच्या निमित्ताने त्यांची भेटही शक्य होणार होती.




१४ ऑक्टोबर२०२३च्या कंकणाकृती आणि ८ एप्रिल २०२४ला होणाऱ्या खग्रास सूर्यग्रहणामध्ये चंद्राच्या सावलीचा मार्गनकाशा. छायाचित्र सौजन्य – अमेरिकन ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटी
https://eclipse.aas.org/eclipse-america-2023-2024

अमावास्येला सूर्य आणि पृथ्वीदरम्यान एका रेषेत चंद्र आला की सूर्यग्रहण होतं. काही वेळा चंद्र सूर्याला अर्धवट झाकतो, ज्याला आपण खंडग्रास सूर्यग्रहण म्हणतो, तर काही वेळा चंद्र सूर्याला पूर्णपणे झाकतो तेव्हा खग्रास सूर्यग्रहण होतं. आकाशात आपल्याला सूर्य आणि चंद्राचा आकार साधारण सारखाच दिसतो. त्यामुळेच खग्रास सूर्यग्रहणाच्या वेळी चंद्र सूर्याला पूर्ण झाकू शकतो. चंद्र पृथ्वीभोवती अंडाकृती किंवा लंबवर्तुळाकार (Oval) कक्षेमध्ये फिरतो. त्यामुळे चंद्र काही वेळा पृथ्वीपासून लांब तर काही वेळा जवळ असतो. चंद्र पृथ्वीपासून लांब असला की त्याचा आकार सूर्यापेक्षा थोडा कमी असतो. अशावेळी सूर्य–चंद्र–पृथ्वी एका रेषेत आले की चंद्र सूर्याला पूर्णपणे झाकू शकत नाही आणि चंद्रामुळे सूर्याचा मध्यभाग झाकला जाऊन चंद्राभोवती सूर्याचं कंकण दिसतं. म्हणूनच आपण त्याला कंकणाकृती सूर्यग्रहण म्हणतो.

ग्रहणाचा दिवस उजाडला तेव्हा पहाटेच आम्ही डॅलसहून सॅन अँटोनियोला कारने प्रयाण केलं. पाच तासांचा तो प्रवास पहाटे पाचला सुरू झाला. ग्रहण लागायला स्थानिक वेळेनुसार १० वाजून ४ मिनिटांनी सुरुवात होणार होती. कंकण स्थिती येईपर्यंत पावणेअकरा वाजून जाणार होते. पहाटे आकाश निरभ्र होतं. सॅन अंटोनिओच्या दिशेने जाऊ लागलो तसतसे क्षितिजावर ढग दिसायला लागले. ग्रहणाच्या वेळी ढग नसणं फार महत्त्वाचं होतं. दहा वाजेपर्यंत सॅन अंटोनिओत पोहोचलो तेव्हा आकाश चांगल्या दाट ढगांनी झाकलेलं होतं. आमचा विरस झाला. ज्यासाठी केला होता अट्टाहास तेच बघायला मिळेल की नाही शंका होती.

सॅन अंटोनिओतून कुठूनही ग्रहण बघता येणं शक्य होतं. आम्ही एका होम डीपोच्या पार्किंगमध्ये थांबलो होतो. आमचे एक नातेवाईक कुटुंबही डॅलसहून आलं होतं. आमच्या पाठोपाठ पंधरा–वीस मिनिटांत तेही पोहोचले. दहा वाजून चार मिनिटांनी चंद्राने सूर्य ओलांडायला सुरुवात केली. सुदैवाने वारा सुटला होता आणि ढगांना वाहून नेत होता. अधूनमधून ढगांआडून सूर्य डोकावला की आम्ही लगेच ग्रहणाचे चष्मे लावून त्याला पाहात होतो. खंडग्रास ग्रहणाचा कालावधी मोठा होता. दरम्यान वाऱ्याने ढगांना पळवून लावावं अशी इच्छा मनोमनी करत आम्ही संधी मिळताच सूर्यदर्शन करत होतो.

वाऱ्याने ढगांना वेळेत पळवून लावले आणि कंकणाकृती ग्रहणाची वेळ जवळ येईपर्यंत ढग पांगले होते. चंद्राने झाकला गेलेला सूर्य आता नीट दिसत होता. चंद्राने हळू हळू सूर्याची ज्योत कमी करत नेल्यासारखा सूर्यप्रकाश कमी कमी होत चालला होता. आमच्या आजूबाजूला काही लोक कुतूहलाने आमच्या ग्रहण चष्म्यांकडे बघत होते. आम्ही त्यांनाही चष्मे दिले. अनेक लोकांना मात्र आकाशातल्या ह्या नाट्याची कल्पनाही नव्हती किंवा असली तरी त्यासाठी थांबून ते बघत बसण्यासाठी त्यांना वेळ नव्हता.


छायाचित्र सौजन्य– डॉ. वायुजीत गोखले, मिसौरी

अनेकजण त्यांच्या रोजच्या व्यवहारात व्यग्र होते.  होम डीपोत आतबाहेर करताना ते कोणत्या गोष्टीला मुकताहेत त्याची त्या बिचाऱ्यांना कल्पनाही नव्हती.

सूर्याच्या वरच्या बाजूने चंद्राने सूर्याला झाकायला सुरुवात केली त्याला आता काही मिनिटं लोटली होती. आता सूर्याची अगदी बारीक कोर आकाशात दिसत होती. काही मिनिटांतच चंद्राने सूर्याचा मध्यभाग झाकला आणि चंद्राभोवती सूर्याचं कंकण झळकू लागलं. ही कंकणाकृती स्थिती साधारण तीन मिनिटांपर्यंत राहिली. हे सूर्यकंकण बघताना आमच्या डोळ्यांचं पारणं फिटत होतं. हे अलौकिक दृश्य पाहायला मिळाल्याचा आम्हाला फार फार आनंद झाला होता. मला आनंदाने हसू येत होतं, भरून येत होतं. ह्या आधी मी काही खंडग्रास सूर्यग्रहणं पाहिली आहेत. १९९५ साली भारतात मी खग्रास सूर्यग्रहण पाहायला खगोल मंडळाच्या चमूसोबत उत्तर प्रदेशात हमीरपूरला गेले होते. तिथे चंद्राने पूर्णपणे झाकलेला सूर्य बघताना, त्यानंतरची 'हिऱ्याची अंगठी' बघताना माझी जशी भारावलेली अवस्था झाली होती तशीच ती हे कंकणाकृती सूर्यग्रहण बघताना झाली. शब्दश: 'जगावेगळा' अनुभव! केवळ अलौकिक आणि अविस्मरणीय!

हळूहळू चंद्र पुढे सरकत गेला आणि पुन्हा खंडग्रास सूर्यग्रहण दिसू लागले. मग मात्र आम्ही पोटोबा करायला रवाना झालो ते ८ एप्रिल २०२४ला होणारं आणि अमेरिकेतून दिसू शकणारं खग्रास सूर्यग्रहण पाहायला जमवता येईल का ह्याचा विचार करतच. ८ एप्रिल २०२४ला होणाऱ्या खग्रास सूर्यग्रहणाचा मार्गनकाशा वरच्या चित्रात आहे. खग्रास सूर्यग्रहण एप्रिलमध्ये अमेरिकेत कुठून

बघता येईल ते ह्या नकाशात पाहायला मिळेल. ह्या खगोलीय घटना आपल्याला याची देहि याची डोळां पाहायला मिळाव्यात ह्यासारखे दुसरे भाग्य ते कोणते!

---



विदुला कोल्हटकर

## दिवाळीची कथा

आटपाट नगर होतं. तिथे एक बाई रहात होती. छानसं घर, नवरा, दोन मुलं, एकंदर सगळं व्यवस्थित चालू होतं. पण दरवर्षी दिवाळी आली की बाई खंतावे. एकटीच घर साफ करत असे. कसंतरी करून सगळ फराळाचं करे, दिव्याच्या माळा, पणत्या लावे, रांगोळी काढे. सगळ्यांच्या मागे लागून लक्ष्मीपूजा करून घेई. जबरदस्तीने मुलांना फराळ खाऊ घालायचा प्रयत्न करत असे. दिवाळी आनंदात पार पडावी म्हणून कुटुंबाच्या मागे लागत असे आणि ते करता करता दमून, रागावून जात असे. मागे लागल्याने कोणालाच दिवाळी साजरी करण्यात रस वाटायचा नाही आणि बाई दरवर्षी आणखीच खंतावत असे.

एके वर्षी आगळंच घडलं. दिवाळीच्या आधी तिने दरवर्षीप्रमाणे घर साफ केलं, दिव्यांच्या माळा लावल्या आणि बाई थकली. जमेल तेवढाच फराळ केला. एकटीनेच पूजा केली. दिवाळीनंतरच्या शनिवारी खास 'दिवाळी ब्रंच' आयोजित केला. जमेल तेवढा केलेला आणि बाकी विकत आणलेला फराळ टेबलावर मांडला, मुलांसाठी पॅनकेक केले आणि ज्याला जे हवं ते घेऊ दिलं. दिवस आनंदात पार पडला. असं ओळीने तीन वर्षं केलं. चौथ्या वर्षी आश्चर्य घडलं. घर साफ करायला नवरा मदतीला आला. दिव्यांच्या माळा लावायला मुलगी मदतीला आली. रांगोळीत रंग भरायला मुलगा मदतीला आला. मुलांनी आणि नवऱ्याने पणत्या लावल्या. लक्ष्मीपूजेसाठी सगळे आपणहून देवघरात आले. शनिवारी 'दिवाळी ब्रंच' आहे ना चौकशी झाली. पॅनकेक तसेच राहिले आणि फराळावर मात्र सगळ्यांनी ताव मारला. बाईने केलेला फराळ आवडल्याचं बाकीच्यांनी आवर्जून सांगितलं. बाईची दिवाळी खरोखर आनंदात पार पडली.

बाई असो अगर बुवा तुम्हाला दिवाळी आनंदाने साजरी करायची असेल तर आधी तुम्ही आनंदात रहा कारण दिवाळी फक्त आजूबाजूला नसते तर ती मनात असावी लागते. मनात असली की आपसूक सगळीकडे पसरते.

बाईची आणि तिच्या कुटुंबाची दिवाळी जशी आनंदात साजरी झाली तशी तुमची आमची सर्वांची होवो. ही साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.



राजेंद्र मोडक

पूर्वप्रकाशन– हा लेख २०२०मध्ये स. प. महाविद्यालयाच्या पुनर्भेट स्नेहसंमेलनानिमित्त प्रकाशित झालेल्या 'मैत्र' ह्या स्मरणिकेत प्रकाशित झाला होता.

## मध्यमा

सस्क्वेहॅना नदीच्या किनारी हाडं गोठविणाऱ्या थंडीत छायाचित्रकारांची वर्दळ भल्या पहाटे सुरु होते. कॅनडा आणि उत्तर अमेरिकेत थंडी वाढल्यावर अनेक पशुपक्षी दक्षिणेकडे स्थलांतर करतात. अमेरिकेचा राष्ट्रीय पक्षी 'बाल्ड ईगल' हे त्यांतले विशेष आकर्षण. या नदीच्या काठी ते शिशिर ऋतूमध्ये येतात. ते नदीमध्ये मासे पकडतानाचा क्षण टिपणे हे सगळ्यांचे उद्दिष्ट असते.

दोन–अडीच तासाचा प्रवास करून, सूर्योदयापूर्वी जागा गाठून, स्तोत्रं, प्रवचनं, जुनी मराठी–हिंदी गाणी ऐकत पक्ष्यांची वाट बघणं हे माझ्या चांगलं अंगवळणी पडलं आहे. मेघांत आणि धुक्यात अडकली किरणे सोडवत सूर्याने सुद्धा आजचा दिवस चांगला सुरू केला होता. अनेक सीगल, उंच उडणारे बाल्ड ईगल, मध्येच नदीत बुड्या मारून मासे पकडणारी कॉर्मोरंट बदके, यांनी दिवसाची नांदी चांगली केली.




आजचा दिवस विशेष ठरला. बहुतेक सगळे गप्पा, वाफाळलेली कॉफी यात मग्न असतानाच एकदम "8 O'clock, approach, high, fast," असा ओरडा झाला. डावीकडून एक बाल्ड ईगल नदीपात्राकडे झेपावत होता. एकदम पळापळ सुरु झाली, सगळे आपल्या कॅमेरा सेटअपकडे धावले. काही क्षणांत त्या पक्षाने वेगाने त्या नदीतल्या माशावर झडप घातली. १०–२० सेकंदांचा सगळा खेळ.








इअरफोनमध्ये बाबूजींच्या आवाजात गाणं सुरु होतं – एक धागा सुखाचा. सुन्न होऊन काही काळ तसाच उभा होतो. ना काढलेल्या फोटोंचं भान होतं, ना तो पक्षी शिकार घेऊन कुठे गेला याचं, ना आजूबाजूच्या छायाचित्रकारांचं. काय बघत होतो मी? नदीत पोहणारा स्वछंदी जीव, क्षणात काळाची झेप पडली आणि सगळं संपलं. त्या जीवाची तडफड, त्याची असहाय्यता,

पक्ष्याच्या पंज्याची मिठी आणि त्यातली ताकद मनाला सुन्न करून गेली. काळाची झेप ती. त्या असहाय जीवाला काय होतंय, का होतंय हे समजलं असेल का?

बाल्ड ईगल नेहेमी पकडलेल्या माशाकडे मान खाली घालून बघतात. बघताना काय म्हणत असतील कोण जाणे? त्या पक्षाची भूक, त्यासाठी जीवाची हत्या, म्हणून त्या माशाची क्षमा मागत असेल का तो पक्षी? गदिमांचे शब्द मनात घुमत होते – एक धागा सुखाचा, शंभर धागे दुःखाचे, जरतारी हे वस्त्र माणसा तुझिया आयुष्याचे.

काय फरक आहे या माशात, या पक्ष्यात आणि आपल्यात? पक्ष्याच्या रूपाने काळाने झडप घातली. क्षणात एकाचा जीव संपला आणि दुसऱ्याचा एक दिवस सरला. ऑस्प्रे आणि असे अनेक पक्षी, प्राणी स्वतःसाठी, आपल्या पिलांसाठी शिकार करताना, त्यांना भरवताना, अनेकदा पाहिले आहेत, फोटो काढले आहेत.








त्या पक्ष्याचा अन्न मिळाल्याचा आनंद, त्या भक्षाची तडफड, हे दोन्ही एकाच वेळी दृष्टीसमोर उमटत होते. वरकरणी पाहता ही निसर्गात नेहमी घडणारी घटना, पण ती आज अंतर्मुख करून गेली. ते दोन्ही जीव, तो संपूर्ण निसर्ग दोन्ही जणू माझ्यात समाविष्ट झाले होते.

जीवो जीवस्य जीवनम  अनेकदा हे वचन लहानपणापासून ऐकले आहे, जे आज दृष्टिपटलासमोर पाहिले. मन, बुद्धी यांना भावले, आणि ही घटना त्यापलीकडे एक जाणीव निर्माण करून गेली. ते जीव, तो निसर्ग आणि मी तद्रूप होऊन गेलो. क्षणभरच. नंतर मात्र विचारांचे काहूर उठले. भगवंतांनी सांख्य योगात सांगितले आहे, अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत । अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना॥ – जन्माला आलेले सर्व जीव हे जन्माआधी प्रकट नव्हते आणि नंतरही नसणार आहेत. हे सर्व प्राणिमात्र, मनुष्य सर्वांना लागू पडणारे तत्त्व आहे. खरंच, या पशुपक्ष्यांत आणि माणसांत काय फरक आहे? बहुतेक सगळे लहानाचे मोठे होतात, शिकतात, संसार थाटून आयुष्य आपल्या परीने व्यतीत करतात, आणि एक दिवस अनंतात विलीन होतात – पशुपक्षी आणि मनुष्य, सगळेच. आपल्या पूर्वसुरींनी याचं समर्पक उत्तर दिलं आहे.

आहार निद्रा भय मैथुनं च, सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम् ।

धर्मो हि तेषामधिको विशेषः, धर्मेण हीनाः पशुभिः समानाः ॥

धर्म! तो एकमेव. निःसंशय. वरकरणी त्या पक्ष्याने हत्या केली, पण ती त्याच्या, त्याच्या पिलांच्या शरीरधारणेसाठी आवश्यक होती. तो त्यांचा शरीरधर्म आहे. मनुष्याला मात्र त्याचा धर्म ओळखून वर्तन करणे आवश्यक आहे. भागवतात दशमस्कंदात एक महावाक्य आहे – दुर्लभो मानुषो देहो देहिनां क्षणभंगुरः। तत्रापि दुर्लभं मन्ये वैकुंठप्रियदर्शनम्॥ – मनुष्य जन्म हा दुर्लभ आहे आणि मिळालेला देह हा क्षणभंगुर आहे, पण त्याहीपेक्षा अवघड म्हणजे मिळालेल्या आयुष्याचा योग्य विनियोग करून ईशस्तत्त्वापर्यंत पोहोचणे.

'विवेकचूडामणी'मध्ये आचार्य यापुढे सांगतात, दुर्लभं त्रयमेवैतत् देवानुग्रहहेतुकम् । मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रय:॥ – तीन गोष्टी मिळवायला अत्यंत कठीण आहेत. ईश्वरकृपेनेच त्या मिळू शकतात. त्या तीन गोष्टी म्हणजे मनुष्यत्व (म्हणजे मनुष्य जन्म), मुमुक्षुत्व (परमार्थाची वाटचाल करण्याची आणि आत्मज्ञान व्हावे ही इच्छा आणि त्यानुसार कृती करणे), आणि महापुरुषांचा सहवास.  आपल्याला मनुष्य जन्म का मिळाला? पशु, पक्षी, वृक्ष, बांडगुळं, कृमी, कीटक असा का मिळाला नाही? याचे कारण ईश्वरकृपा हेच. ज्याच्या ठायी हा ज्ञानस्पर्श होतो तिथे कारुण्यभाव प्रकटतो.

पंचमहाभूतात्मक हा देह पंचेंद्रियांच्या आधीन आहे. त्यातही दृष्टीने आपले बहुधा ७०–८० टक्के व्यवहार होतात. पण जे डोळे हे दृश्यविश्व बघू शकतात, ते स्वतःला मात्र बघू शकत नाहीत. त्यासाठी त्यांना आरसा लागतो. मनुष्याचे काहीसे असेच आहे. ईश्वराने निसर्गरूपाने हा संपूर्ण देखावा आरशातील प्रतिमेसारखा समोर उभा केला आहे, त्यात 'स्व'ला पाहणे हे आपले कर्तव्य आहे, आपला धर्म आहे.

ट्रेकिंग करताना डोंगरशिखरापर्यंत जाणं हा एक अवघड प्रवास असतो. शिखर गाठणे हा एकच भाव, एकच उद्दिष्ट समोर असतं. पण एका शिखरावर पोहोचल्यावर दिसतं की पुढे अजून बरंच आहे. फक्त एक मध्यमा आपण गाठली आहे. त्या शिखरापर्यंत पोहोचेपर्यंत फक्त गोष्टी ऐकलेल्या असतात, नंतर मात्र अनुभव येतो. आता बहुतेक सगळे असेच या आयुष्याच्या मध्यमेवर आहेत, काही शिखरे पादाक्रांत केली आहेत. अजून बरीच गाठायची आहेत. आपल्या पूर्वजांनी, वरिष्ठ पिढीने, समाजाने हा अमोघ ठेवा आपल्यात संस्काररूपाने संक्रमित केला आहे. हा समजून, उमजून आणि अंगीकारून पुढे संक्रमित करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे.

स.प. महाविद्यालयाचे बोधवाक्य आहे, निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु| हे वाक्य भर्तृहरीच्या नीतिशतकातून घेतलं आहे. भर्तृहरीचा मूळ श्लोक असा आहे –

किं कूर्मस्य भरव्यथा न वपुषि क्ष्मान्न क्षिपत्येष यत्

किं वा नास्ति परिश्रमो दिनकरस्यास्ते न यन्निश्चलः।

किन्त्वङ्गीकृतमुत्सृजनङ्कृपणवच्छलाघ्यो जनो लज्जते

निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु सतामेतद्धि गोत्रव्रतम्॥

कासव हे पाठीवर अवघ्या पृथ्वीचा भार वाहते, पण ढकलून देत नाही, त्याला काय ते जड होत नसेल? सूर्याचे चालणे कधीच थांबत नाही, त्याला थकवा येत नसेल? एकदा सुरू केलेले कार्य मध्येच क्षुद्रपणे सोडून देणे हे थोर लोकांना संकोचाचे वाटते (थोर कधी हाती घेतलेले कार्य अर्धवट सोडत नाहीत). हाती घेतलेले तडीस नेणे हे अशा थोरांच्या कुलव्रतासारखे असते.

हे धर्मकार्य मोठे कार्य आहे आणि ही शिकवण मार्गदर्शक आहे. भारताला हिंदू धर्माचा आणि महाराष्ट्राला संत परंपरेचा मोठा वारसा लाभला आहे. आपल्या कथा, कविता, नाटकं आणि शिक्षणसंस्था यांनी तो स्वीकारून, अंगिकारून आपल्याला फार मोठं देणं दिलं आहे. आपल्या कवींनीसुद्धा या धर्मतत्त्वांचा वापर त्यांच्या वाङ्मयात केला आहे. सुधीर मोघे लिहितात, अरूपास पाहे रूपी तोच भाग्यवंत, निसर्गात भरूनी राहे अनादी अनंत.

य: पश्यति, स पश्यति |

---

## गणपती बाप्पा मोरया!



योगिनी दहिवदकर

जलरंगातील चित्र





शुभदा जोशी-पारखी

## अ...अमेरिकेचा...?

युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, ज्याला आपण "अमेरिका"या संक्षिप्त नावाने संबोधित करतो, तिथे प्रत्यक्ष जाण्याचा योग हा असा जुळून येईल, असं कधीच वाटलं नव्हतं. निसर्गसौंदर्याने नटलेल्या, तसेच मानवनिर्मित आश्चर्यांनी भरलेल्या आणि आर्थिक महासत्ता असलेले विकसित राष्ट्र म्हणून ज्याने जगावर आपली छाप उमटवली आहे, अशा अमेरिकेत पर्यटक म्हणून कधीतरी एकदा जाण्याची इच्छा, इतर अनेकजणांप्रमाणे मलाही होती.पण तिथे फक्त पर्यटक म्हणून नाही तर, अनिवासी भारतीय म्हणून राहण्याचा योग जुळून आला, तो अमेरिकेत सॉफ्टवेअर प्रोफेशनल म्हणून कार्यरत असणाऱ्या माझ्या पतीसोबत, साधारण पावणेदोन वर्षांपूर्वी माझी लग्नगाठ बांधली गेली, तेव्हा...!

लग्नानंतर १०-१२ दिवसांनी माझे पती कामावर रुजू होण्यासाठी अमेरिकेत परतले. मी अमेरिकेत जाण्यासाठीचे व्हिसाचे सोपस्कार पूर्ण झाल्यावर प्रवासाची तारीख निश्चित करून विमानाचं तिकीट काढलं. हे सगळं होईपर्यंत तीन महिन्यांचा काळ उलटून गेला होता. प्रवासाची तारीख जसजशी जवळ येत होती, तसतशी प्रवासाबाबतची उत्कंठा वाढत होती. अखेर प्रवासाचा दिवस येऊन ठेपला. घरचे तसेच आप्तेष्टांचा जड अंतःकरणाने निरोप घेऊन मी निघाले आणि ठरल्या वेळेनुसार विमानतळावर पोहोचले. विमानतळाच्या आत प्रवेश केल्यानंतर तेथील आवश्यक गोष्टी म्हणजे चेक-इन, सिक्युरिटी चेक इत्यादी झाल्यावर, बोर्डिंगसाठीच्या ठिकाणी येऊन मी स्थिरावले. साधारण तासाभरानंतर विमानात आम्ही प्रवासी जाऊन बसण्यास सुरुवात झाली. प्रस्थान वेळेनुसार विमानाने उड्डाण केलं आणि माझ्या पहिल्या आंतरराष्ट्रीय विमानप्रवासावर शिक्कामोर्तब झालं...!

माझा हा विमानप्रवास अबुधाबीमार्गे होणार होता. तेथील विमानतळावर पोहोचल्यानंतर ६ तासांच्या अंतराने विमान बदलून पुढील अमेरिकेपर्यंतच्या प्रवासासाठी मी सज्ज झाले. हा प्रवास जास्त वेळाचा होता, पण विमानातील खाणे-पिणे आणि मनोरंजनाच्या सुविधांमुळे हा प्रवास सुखकर होण्यास मदत झाली. विमान उतरण्याची वेळ जवळ येत होती तसं माझ्या मनातलं अमेरिकेबद्दलचं कुतुहल वाढत होतं. जवळपास चौदा तासांच्या प्रवासानंतर विमान उतरलं आणि अमेरिकेच्या भूमीवर मी पहिल्यांदा पाऊल ठेवलं. अर्थातच, विमानतळावर मला घ्यायला माझा नवरा आला होता. तीन महिन्यांनंतर आम्ही प्रत्यक्ष एकमेकांसोबत असण्याचा आनंद शब्दात मावणारा नव्हता...!

आम्ही विमानतळावरून घरी जायला निघालो. गुळगुळीत रस्त्यावरून रहदारीचे नियम धाब्यावर न बसवता, त्याचे काटेकोरपणे पालन करत प्रवास करणारे लोक हा माझ्यासाठी एक सुखद अनुभव होता. स्वतःच्या गाडीतून घरापर्यंतचा हा पहिला छोटा प्रवास माझ्यासाठी बऱ्याच नवीन गोष्टींची ओळख करुन देणारा ठरला. त्या दिवसापासून माझ्या अमेरिकेतील वास्तव्यास सुरुवात झाली.

इथले लोक, त्यांची भाषा, राहणीमान, संस्कृती अशा अनेकविध गोष्टींबरोबरच सर्वात महत्त्वाचं म्हणजे इथल्या हवामानाशी जुळवून घेत माझी दिनचर्या सुरु झाली. अर्थातच, सुरुवातीला हे थोडं कठीण गेलं. पण आता हळूहळू अंगवळणी पडतंय. इथली स्वावलंबी जीवनपद्धती हा आपल्यासाठी एका अर्थाने महत्त्वाचा आणि चांगला बदल म्हणावा लागेल. पण, तांत्रिकदृष्ट्या प्रगत असलेल्या या देशात बहुतेक सर्व कामांकरिता अत्याधुनिक यंत्रांची उपलब्धता देखील तेवढीच आहे. प्रशासकीय स्तरावरील गोष्टींमध्ये असणारी सुसूत्रता आणि पारदर्शकता नक्कीच प्रशंसनीय आहे. पायाभूत सोयीसुविधांनी परिपूर्ण असल्यामुळे या देशात राहणे ही निश्चितच एक समाधानकारक बाब ठरते. अर्थातच, इथली लोकसंख्या भारताच्या तुलनेत बऱ्यापैकी कमी असल्याने ते सहजसाध्य होणारे आहे. तुलनेनं कमी असणारे वायू आणि ध्वनी प्रदूषण इथलं जीवनमान अधिक सुकर करतं. नैसर्गिक साधनसंपत्तीचं जतन आणि

संवर्धनाबाबत अधिक जागरूक असणारे लोक आणि प्रशासन ह्यांचादेखील आवर्जून उल्लेख करावा लागेल. इथले नॅशनल पार्क्स आणि स्टेट पार्क्स यांची संख्या जणू त्याचीच प्रचिती देतात. मुळातच, निसर्गसौंदर्याचे वरदान लाभलेल्या या देशात प्रेक्षणीय स्थळांची यादी न संपणारी आहे..!

पण प्रत्येक नाण्याला जशा दोन बाजू असतात, तसंच प्रत्येक गोष्टीला देखील एक चांगली आणि दुसरी न रुचणारी बाजू असते. इथे राहाताना अशा अनेक न रुचणाऱ्या गोष्टी आपल्या भोवती फेर धरून असतात. आपल्या पालकांची आणि भारतातील आप्तेष्ट तसेच मित्रपरिवाराची वर्षातून होणारी एखाद–दुसरी भेट, त्यांच्यासमवेत दरवर्षी साजरे न करता येणारे सण–समारंभ, इथे सहजासहजी न मिळणारे पारंपरिक खाद्यपदार्थ आणि पेहराव. न परवडणारे घरगुती किंवा इतर कामांसाठीचे मदतनीस. तुलनेनं खूपच मर्यादित असणारं 'सोशल–लाईफ'आणि त्यामुळे जाणवत राहणारं एकाकीपण. अशा अनेक गोष्टींबरोबर जुळवून घेत आपल्याला पुढे जावं लागतं. अर्थात, प्रत्येक व्यक्तीचा या गोष्टींकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगळा असू शकतो. पण, आयुष्यात काही मिळवायचं असेल तर काही गमवावं ही लागतं, हे इथं तंतोतंत लागू होतं...!

शिक्षण आणि गुणवत्तेनुसार डॉलरमध्ये कमावण्याची संधी देणाऱ्या अमेरिकेत नक्कीच ते सगळं आहे, जे सुखवस्तू जीवन जगण्यासाठी आवश्यक असतं. ज्याला लोक,"Living American Dream"असंही म्हणतात. पण,सुख म्हणजे नक्की काय असतं?....हे मात्र ज्याचं त्यानंच ठरवायचं असतं..!



बाल्टिमोर मराठी मंडळ
मैत्र



**सुधीर लिमये,** पेण

निवृत्त अधिकारी,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ



प्रिया जोशी

# भगवान विष्णूंची २४ नांवे : भाग २

एप्रिल २०२३च्या मैत्राच्या अंकामध्ये भगवान विष्णूंची २४ नांवे : भाग १ प्रकाशित झाला होता व त्यात विष्णूच्या पहिल्या चार नावांसंबंधी माहिती दिली होती. ह्या भागामध्ये त्यापुढील चार नावांची माहिती दिलेली आहे.

**<u>विष्णवे नम:</u>**

विष्णू हे आचमनातील पाचवे नाव. विष्णवे नमः ते हरये नमः ही नावे उच्चारताना हात जोडलेल्या स्थितीत असावेत. विष्णू षोडशनाम स्तोत्रात 'औषधे चिन्तयेद्विष्णु' म्हणजेच औषध घेत असताना भगवान विष्णूंचे स्मरण करावे असे सांगितले आहे.

जो सर्वांना अंतर्बाह्य व्यापून टाकतो, व जो सर्वांमध्ये व्याप्त आहे तो विष्णू. सर्व विश्वाला व्यापून असणारा विष्णू. ज्याच्या कांतीने पृथ्वी, आकाश, व सारे विश्व व्यापले आहे असा तो विष्णू. विश्+अणू = अणुमध्येही प्रवेश करू शकणारा, अतिसूक्ष्म रूप धारण करणारा तो विष्णू.

विष्णू सहस्रनामातील २, २५८, ६५७ वे नांव विष्णू आहे. भगवद्गीतेत विष्णू नावाचा उल्लेख विश्वरूप दर्शन योग (अकराव्या) अध्यायात २४ व्या व ३० व्या श्लोकांत दोनदा आहे. श्रीकृष्णाचे विराट विश्वरूप पाहून भयभीत झालेला अर्जुन म्हणतो, 'हे विष्णो, हे विराट रूप पाहून मी भयभीत झालो आहे, त्यामुळे माझे मनोधैर्य आणि मनःशांती नष्ट झाली आहे ॥२४॥', 'हे विष्णो,आपल्या विशाल मुखाने आपण सर्व लोकांचा घास करून गिळत आहात व आपल्या जिभेने सर्व बाजूंनी चाटत आहात व हे सर्व विश्व आपल्या देदीप्यमान प्रकाशाने उजळून निघत आहे व तप्तही होत आहे. ॥३०॥'




रानी की बाव, पाटण, गुजरात येथे भगवान विष्णूची गदा, चक्र, शंख, पद्म आयुधे असलेली त्रिभंगा स्थितीतील विविध अलंकारांनी विभूषित सुंदर मूर्ती पहावयास मिळते. फोटो – श्री.चंद्रहास हालाई, माहिती – श्री.पुरूषोत्तम लेले यांचे फेसबुक पेज

विष्णूरूपात हातातील आयुधे अश्या पध्दतीने असतात – उजव्या समोरच्या हातात – कौमोदकी गदा, उजव्या पाठीमागच्या हातात – सुदर्शन चक्र, डाव्या पाठीमागच्या हातात – पांचजन्य शंख, डाव्या समोरच्या हातात – पद्म. विष्णूची शक्ती धृती, तर लक्ष्मीरूप पद्मिनी आहे.

**मधुसुदनाय नमः**



लक्ष्मी नृसिंह मंदिर, नुग्गेहळ्ळी, ता. चन्नरायपट्टम, जि. हसन, कर्नाटक येथील होयसळा शैलीतील उजवीकडून चक्र, शंख, कमळ, गदा आयुधे असलेली मधुसुदनाची स्थानक मूर्ती. फोटो – टी. एस. गोपाळ, माहिती – श्री. पुरूषोत्तम लेले यांचे फेसबुक पेज

आचमनातील सहावे नाव ॐ मधुसुदनाय नमः असे आहे. विष्णू सहस्रनामातील ७३वे नाव मधुसुदन आहे. मधुसुदनाची शक्ती शांती आहे तर लक्ष्मीरूप कमलालया आहे. श्री विष्णू षोडशनाम स्तोत्रात म्हटले आहे की, 'दु:स्वप्ने स्मर गोविन्दं संकटे मधुसुदनम्', म्हणजेच, संकटात मधुसूदनाचे स्मरण करावे म्हणजे संकटाची तीव्रता कमी होते, संकट दूर होते. भगवद्गीतेत पहिल्या, सहाव्या व आठव्या अध्यायात अर्जुनाने तर दुसऱ्या अध्यायात संजयाने श्रीकृष्णाचा मधुसूदन असा उल्लेख केल्याचे पाहायला मिळते.

मधु नावाच्या राक्षसाचा वध केला म्हणून मधुसूदन. देवी भागवतातील कथेनुसार भगवान विष्णू योगनिद्रेत असताना त्यांच्या कानातील मळापासून मधू व कैटभ हे दोन राक्षस निर्माण झाले. त्यांनी कठोर तपश्चर्येने देवी भगवतीकडून त्यांची इच्छा असेल तेव्हाच मरण येईल असे वरदान मिळवले होते. विष्णूंनी मधु–कैटभाचा पराभव केला पण ते त्यांना ठार मारू शकले नाहीत. विष्णूंनी देवी भगवतीच्या सल्ल्यानुसार योजना आखली. विष्णूंनी मधु–कैटभांच्या पराक्रमाची स्तुती केली व त्यांना वर मागण्यास सांगितले. त्याचवेळी देवी भगवतीने मधु–कैटभांना मोहित केले. उन्मत्त झालेल्या त्या दोघांनी भगवान विष्णूंनाच उलट वर मागायला सांगितले. त्यावेळी विष्णूंनी मला तुमचा मृत्यु हवा आहे असे सांगितले. त्यामुळे मधू-कैटभांना मृत्यू आला.

बुलढाणा जिल्ह्यातील लोणार येथे, लवणासुर दैत्याचा भगवान विष्णूंनी वध केला होता तेथे भगवान विष्णूंना दैत्यसुदन म्हटले जाते. मधुसूदन रूपात विष्णूंची हातातील आयुधे अश्या पध्दतीने असतात– उजव्या समोरच्या हातात – सुदर्शन चक्र, उजव्या पाठीमागच्या हातात – पांचजन्य शंख, डाव्या पाठीमागच्या हातात – पद्म, डाव्या समोरच्या हातात – कौमोदकी गदा.

**त्रिविक्रमाय नमः**

आचमनातील सातवे नाव त्रिविक्रमाय नमः असे आहे. विष्णू सहस्रनामातील ५३० वे नाव त्रिविक्रम आहे. तिन्ही लोकांना जिंकणारा, त्रिविक्रम रूपात ज्याने तीन पावले टाकत स्वर्ग, पृथ्वी व पाताळ हे तिन्ही लोक व्यापले तो.

श्रीविष्णू षोडशनाम स्तोत्रात म्हटले आहे, 'युद्धे चक्रधरं देवं प्रवासे च त्रिविक्रमम्', अर्थात, युद्धामध्ये चक्रधारी श्रीकृष्णाचे स्मरण करावे तर प्रवासात त्रिविक्रमाचे स्मरण करावे म्हणजे प्रवास सुखाचा होतो.

भगवद्गीतेत अर्जुनाने अथवा संजयाने श्रीकृष्णाचा त्रिविक्रम नावाने उल्लेख केलेला नाही. बळी हा भक्त प्रल्हादाचा नातू. हिरण्यकश्यपुचा पणतू, असुर कुळातला. त्याने इंद्राचे राज्य मिळवण्याच्या हेतूने शंभर यज्ञ केले. म्हणून इंद्राने विष्णूकडे सहाय्य



लक्ष्मी नारायण मंदिर, जवागल, कर्नाटक येथील मंदिराच्या बाह्य भिंतीवर प्रदक्षिणा मार्गावर भगवान विष्णूची पद्म, गदा, चक्र, शंख आयुधे असलेली त्रिविक्रम रूपातील मूर्ती. फोटो – श्री. पांडुरंग शर्मा, माहिती – श्री. पुरूषोत्तम लेले यांचे फेसबुक पेज.

मागितले. विष्णूने कश्यप व अदिती यांच्या पोटी वामनरूपात जन्म घेतला. इंद्र त्याचा मोठा भाऊ. वासव म्हणजे इंद्र. म्हणून विष्णूचे वासवानुज (३२२)असेही नाव आहे. त्रिविक्रम हे वामन अवतारात भगवान विष्णूचे विराट रूप म्हणायला हरकत नाही. आधी वामन रूप, व नंतर बळीने दानाचा संकल्प सोडल्यानंतर त्रिविक्रम रूप धारण केले.

त्रिविक्रम रूपात विष्णूच्या हातातील आयुधे अश्या पध्दतीने असतात– उजव्या समोरच्या हातात – पद्म, उजव्या पाठीमागच्या हातात – कौमोदकी गदा, डाव्या पाठीमागच्या हातात – सुदर्शन चक्र, डाव्या समोरच्या हातात – पांचजन्य शंख.

**वामनाय नमः**

आचमनातील आठवे नाव ॐ वामनाय नमः असे आहे. विष्णू सहस्रनामातील १५२ वे नाव वामन आहे. वामन याचा अर्थ उंचीने कमी असलेला किंवा बुटका. दुसरा अर्थ मौंजीबंधनाच्यावेळी झालेला बटू. जो बळीच्या यज्ञात वामन रूपाने आला होता. उत्तम प्रकारे भक्ती करण्यास योग्य असणारा.

श्रीविष्णू षोडशनाम स्तोत्रात असे म्हटले आहे की, 'गमने वामनं चैव, सर्व कार्येषु माधवम्', अर्थात, प्रवासाला आरंभ करण्यापूर्वी श्रीकृष्णाचे स्मरण करावे म्हणजे ज्या कार्याला आपण निघालो आहोत ते काम सफल होते.

भगवद्गीतेत अर्जुनाने अथवा संजयाने श्रीकृष्णाचा वामन म्हणून उल्लेख केलेला नाही. वामनरूपी विष्णूची शक्ती दया आहे तर लक्ष्मी रूप वृषाकपि आहे. समुद्रमंथनातून मिळालेले अमृत पिऊन देवगण बलशाली झाले. देवांनी अमृत दिले नाही म्हणून दैत्यांना मोठे दुःख झाले, क्रोध आला. त्यांनी देवांबरोबर युद्ध चालूच ठेवले. शेवटी इंद्राने वज्र हाती घेतले व दैत्यांकडील बळीला वज्राने मारले. नारदमुनींनी देवांना दैत्यसंहारापासून परावृत्त केले. युद्ध थांबले. नारदमुनींच्या म्हणण्यानुसार राजा बळीचा देह घेऊन असुर गुरू शुक्राचार्यांच्याकडे गेले. त्यांनी संजीवनी मंत्रसामर्थ्याने बळीला पुनर्जीवित केले. दैत्यराजा बळी समर्थ होता व गुरूभक्तही होता, म्हणून तो सामर्थ्यशाली झाला होता. त्याच्या सेनेने इंद्राच्या अमरावतीला घेरले. बळीने स्वर्गात सर्व लोकांवर विजय मिळवला. त्यामुळे बृहस्पती गुरूंच्या आदेशानुसार, स्वर्गातील सर्व देवांना स्वेच्छेनुसार रूप धारण करून स्वर्गाचा त्याग करून लपून राहावे लागले.



होयसळेश्वर मंदिर, हळेबिडू, कर्नाटक, येथील मंदिराच्या मंडोवरावर वामन बटू, बळी राजा व त्याची पत्नी विंध्यावली यांचे सुंदर शिल्प. राजा बळी हातातील झारीने वामनरूपी बटूच्या हातात संकल्प करून पाणी सोडत आहे. माहिती – श्री.पुरूषोत्तम लेले यांचे फेसबुक पेज

कश्यप ऋषींच्या दोन भार्या होत्या – दिती आणि अदिती. दितीचे पुत्र दैत्य, सर्व राक्षस. तर आदितीचे पुत्र आदित्य, सर्व देवतागण. आपल्या पुत्रांमध्ये काही सामर्थ्य राहिले नाही, त्यांचे वैभव राहिले नाही, तेव्हा आदितीने त्यांना वैभव प्राप्त व्हावे म्हणून, कश्यप ऋषींच्या सांगण्यावरून 'पयोव्रत' केले. भगवंत प्रसन्न झाले, पण दैत्य धर्मपूर्वक राहात असल्याने देवगण दुर्बळ झाले असले तरी काही करू शकले नाहीत. मात्र इंद्राला इंद्रपद मिळवून देण्यासाठी, इंद्राचा लहान भाऊ होण्यासाठी अदितीच्या पोटी भाद्रपद शुद्ध द्वादशीला भगवंतांनी जन्म घेतला. वामनरूप धारण केले. वामन रूपातील भगवंतांचा यज्ञोपवित संस्कार झाला. सूर्यदेवांनी गायत्री मंत्राचा उपदेश केला. वृक्षाधिपती चंद्राने दंड दिला, मातेने कौपीन दिले, आकाश देवतेने छत्री दिली. ब्रह्मदेवांनी कमंडलू दिला. सप्तर्षींनी कुश, सरस्वतीमातेने अक्षमाला दिली, यक्षराजाने भिक्षापात्र दिले.

नर्मदा किनाऱ्यावर भृगुकच्छ राजा बळी यज्ञ करीत होता तिथे बटु वेषातील भगवान एका हातात छत्री, दुसऱ्या हातात कमंडलु, कुश घेऊन पोहोचले. बटूच्या दर्शनाने राजा बळी मंत्रमुग्ध होऊन पाहतच राहिला. भानावर येऊन त्याने बटूचे अर्घ्य–पाद्यासहित सर्व उपचारांनी स्वागत केले व 'आपली काय इच्छा असेल ते मागावे, मी देण्यासाठी तयार आहे' असे सांगितले. भगवान म्हणाले, "तू जे वचन उच्चारलेस ते तुझ्या कुळपरंपरेला साजेसेच आहे. तू प्रल्हादाचा वंशज आहेस. राजा, तू सगळे काही देऊ शकतोस हे जरी खरे असले तरी मला फार काही नको. मला अधिक वस्तूंची लालसा नाही. तीन पावले जमिनीपेक्षा अधिक मला काही नको. तेवढ्याने मी संतुष्ट आहे." हे ऐकून राजा बळीला हसू आले. तो म्हणाला, "इतकेच ना? मी तयार आहे." असे म्हणत संकल्प सोडण्यासाठी त्याने हातात झारी घेतली. दान करण्याच्या तयारीत असलेल्या राजा बळीला पाहून गुरू शुक्राचार्यांना वाटले की राजा बळी घोटाळ्यात येणार आहे. हा वामन दिसतो छोटा पण आहे मोठा खोटा. त्यांनी बळीला त्याची कल्पना दिली, "हे बळी, हा बटू म्हणजे साक्षात भगवान विष्णू आहेत. एका पावलातच पृथ्वी व्यापतील. आपल्याला राहायला घरही राहणार नाही. तरी हे करू नकोस."

बळीने शुक्राचार्यांना सांगितले, "साक्षात विष्णू आले असतील तर चांगलेच आहे. मी दान देणारच." सुवर्णकुंभ घेऊन बळीची पत्नी विंध्यावलीही तेथे आली. त्यांनी वामन भगवानांचे छोटे छोटे चरण प्रक्षालन करून पूजा केली व दानाचा संकल्प करण्यासाठी हातात जल घेऊ लागले. तेव्हा शुक्राचार्य सूक्ष्म

रुप धारण करून सुवर्णकुंभाच्या तोटीत जाऊन बसले व पाण्याचा मार्ग रोखून धरला. (तेव्हापासून एखाद्या योजनेत खोडा घालण्यासाठी काहीतरी कारण काढून विरोध करणाऱ्या लोकांना झारीतील शुक्राचार्य म्हणू लागले.)

तेव्हा वामनरूपी भगवानांनी, हातातील कुशाने तो मार्ग मोकळा केला. हातावरून उदक सोडत राजाने आणि राणीने संकल्प सोडला. बळीने दानाचा संकल्प सोडल्यानंतर विष्णूने त्रिविक्रम रूप धारण केले. वामनरूपी भगवानांनी एका पावलाने स्वर्ग व्यापला, दुसऱ्या पावलाने पृथ्वी व्यापली व बळीला तिसरे पाऊल कुठे ठेवू असे विचारले असता बळीने आपले मस्तक पुढे केले. भगवानांनी त्याचे मस्तकावर पाऊल ठेवले व त्यास पाताळात लोटले. बळी चिरंजीव झाले. सप्तचिरंजीवांमध्ये त्याचेही नाव घेतले जाते –

अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमानश्च बिभीषणः

कृपः परशुरामश्च सप्तैतः चिरंजीविनः ।।

सुभाषितकारांनी बळीच्या अतिदानासंबंधी, दुर्योधनाच्या अतिमानी स्वभावा व अभिमानासंबंधी, रावणाच्या अतिगर्व, अहंकारासंबंधी नाराजी व्यक्त करत अतिरेक सर्वत्र टाळावा असे सुचविले आहे.

अति दानात् बलिर्बद्धः अभिमानात् सुयोधनः

विनष्टो रावणो लौल्यात् अतिः सर्वत्र वर्जयेत् ||

वामन रूपात विष्णूच्या हातातील आयुधे अश्या पद्धतीने असतात– उजव्या समोरच्या हातात – पांचजन्य शंख, उजव्या पाठीमागच्या हातात – सुदर्शन चक्र, डाव्या पाठीमागच्या हातात – कौमोदकी गदा, डाव्या समोरच्या हातात – पद्म. विष्णूंच्या चोवीस नावांमध्ये वामन व नृसिंह ही दोन नावे विष्णू दशावतारातील आहेत.



# पौराणिक कथा (भाग ४) – बुध आणि इला



अवंती करंदीकर

मैत्रच्या जानेवारी २०२१ च्या अंकामध्ये पौराणिक कथा हे सदर सुरू झाले आणि त्या सदारांतर्गत पहिले तीन लेख ह्यापूर्वी प्रकाशित झाले आहेत जे खालील दुव्यांवर वाचता येतील – पौराणिक कथा भाग १ – पुराणांची माहिती , पौराणिक कथा भाग २ – अष्टवसूंची कथा, पौराणिक कथा भाग ३ – सूर्य आणि संज्ञा.

त्याच सदरामधील ही चौथी कथा. ह्या कथेमध्ये आपण बुध आणि इलेची कथा ऐकूया. बुध आणि इलेच्या कथेमध्ये पुराणांनुसार तफावती आढळतात. पुढील कथा ही मुख्यत्वे लिंग पुराणातील संदर्भ, भागवत व विष्णूपुराणातील संदर्भ, अमर चित्रकथा, महाभारतातील काही कथा व माझ्या आजीने लहानपणी सांगितलेल्या कथांचा आधार घेऊन लिहिलेली आहे, तरी ह्यात त्रुटी असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आपण मागच्या कथेमध्ये वाचले की सूर्य आणि संज्ञेचा पहिला पुत्र म्हणजे वैवस्वत मनू. ह्या वैवस्वत मनूचा विवाह श्रद्धेशी होतो. अनेक पुराणांमध्ये श्रद्धा कोणाची मुलगी होती ह्याबद्दल तफावत आढळते. भागवतपुराण आणि विष्णूपुराणांमधील संदर्भांनुसार श्रद्धा ही ब्रह्मदेवाची मुलगी. अनेक दिवस श्रद्धा आणि वैवस्वत मनू ह्यांना मूल होत नाही. आपला वंश चालू राहावा या हेतूने वैवस्वत मनू वसिष्ठ ऋषींची मदत मागतो. वसिष्ठ ऋषी, मित्र आणि वरुण ह्यांच्या मदतीने यज्ञ करतात आणि त्यातून वैवस्वत मनूला मुलगी होते. तिचे नाव इला. परंतु वैवस्वत मनूला आपला वंश चालविण्यासाठी मुलगा हवा असतो म्हणून तो वसिष्ठ ऋषींना मुलीचे लिंग बदलून मुलगा करण्याची विनंती करतो. त्याच्या विनंतीला मान देऊन वसिष्ठ ऋषी आपल्या योगसामर्थ्याने इलाला मुलगा करतात. त्याचे नाव सुद्युम्न. सुद्युम्ननंतर वैवस्वत मनूला अजून ९ मुले होतात, त्यापैकी इक्ष्वाकू हा सूर्यवंशाचा संस्थापक म्हणून सगळ्यांना माहीत आहेच.

सुद्युम्न पुढे बाह्लिक राज्याचा राजा होतो आणि सुखाने राज्य करू लागतो. एकदा मृगयेसाठी सुद्युम्न एका हरिणाचा पाठलाग करत असताना चुकून सुकर्मा (दुसरे नाव श्रवण) वृक्षवाटिकेमध्ये शिरतो. लिंग पुराणातील संदर्भांनुसार शंकराने पार्वतीसोबत एकांत मिळावा ह्यासाठी ही वृक्षवाटिका बनवलेली असते व त्यांचा एकांत भंग पावू नये म्हणून शापित केलेली असते. शंकराचा अपवाद वगळता जर इतर पुरुषाने त्यात प्रवेश केला तर त्याचे स्त्रीमध्ये रूपांतर होईल असा हा शाप असतो. त्यामुळे सुद्युम्न, त्याच्याबरोबर आलेले सर्व पुरुष सैनिक आणि नर घोड्यांचे स्त्रीरूपात परिवर्तन होते.

ह्या परिवर्तनामुळे सुद्युम्न आपले पूर्वायुष्य विसरतो आणि आपले नाव इला ठेवतो. इला रानोरानी भटकू लागते. ह्याच दरम्यान इला आणि बुध (चंद्राचा मुलगा) ह्यांची भेट होते आणि ते प्रेमात पडून लग्न करतात. त्यांना पुढे मुलगा होतो ज्याचे नाव पुरुरवा. पुरुरवा हा अशाप्रकारे चंद्रवंशाचा संस्थापक म्हणून ओळखला जातो.

इकडे सुद्युम्न परतला नाही म्हणून शोध चालू होतो आणि वसिष्ठ ऋषींना पाचारण केले जाते. वसिष्ठ ऋषी आपल्या योगसामर्थ्याने झालेला प्रकार ओळखतात आणि शंकराकडे याचना करतात. तेव्हा शंकर म्हणतात, “माझा शाप खोटा होणार नाही. पण मी उ:शाप देतो की इला प्रत्येक महिन्याला स्वतःचे लिंग बदलून स्त्री आणि पुरुष म्हणून वावरू शकते. मात्र तिला स्त्री असताना पुरुषाचे आणि पुरुष असताना स्त्रीचे आयुष्य मात्र तिच्या/त्याच्या लक्षात राहणार नाही.“

ह्यावर आनंदित होऊन वसिष्ठ ऋषी बुधाकडे जाऊन घडलेला सर्व वृत्तांत सांगतात. बुधाला इलेची दया येते आणि तो अतिशय आनंदाने तिला एक महिना आपली पत्नी तर एक महिना जेव्हा ती इलेची सुद्युम्न होते तेव्हा आपला शिष्य मानतो. सुद्युम्न पुढे पुरुरव्यासमवेत स्वदेशी परततो आणि परत लग्न करतो. त्याला उत्कल, गया, विनिताश्व (दुसरे नाव हरिताश्व) अशी तीन मुले होतात. नित्यक्रमाने महिना संपत आला की सुद्युम्न स्वतःला खोलीत बंद करत असे आणि इला होऊन बुधाबरोबर स्त्रीचे आयुष्य जगत असे. ह्या अशा दर महिन्याच्या बदलामुळे राज्यकारभारावर ताण पडू लागतो. ते पाहून सुद्युम्न शेवटी आपल्या चार मुलांना चार प्रांत देऊन वानप्रस्थाश्रमी प्रयाण करतो. काही पुराणांमध्ये ह्या संदर्भातही तफावत आढळते. काही पुराणे पुरुरव्याकडे सर्व राज्यकारभार सोपवला असे सांगतात तर काही पुराणे चार मुलांना चार प्रांत दिले असे सांगतात. काही पुराणांमध्ये सुद्युम्नाच्या शापमुक्ततेबद्दल संदर्भ दिले आहेत. सुद्युम्नला, सुद्युम्न आणि इला अशी दोन आयुष्ये जगण्याचा कंटाळा येतो आणि तो शंकराची याचना करतो. त्यावर शंकराला हसू येते मात्र पार्वतीला त्याची खूप दया येते आणि ती त्याला त्या शापातून मुक्त करते असेही संदर्भ आढळतात. शापातून पूर्णपणे मुक्त झालेला सुद्युम्न परत राज्यकारभाराला लागतो आणि बुध स्वर्गात परततो असे संदर्भही सापडतात.

तर मंडळी अशी ही बुध आणि इलेची कथा. तुम्हाला ती आवडली असेल. अशी आशा आहे. अशाच आणखी कथा पुढील भागांमधून पाहू.





डॉ. सुनील दादा पाटील, जयसिंगपूर

## वीर जवानांचे गाव: सैनिक टाकळी

कृष्णेच्या कवेतील टाकळीमधल्या शूरांनी पहिल्या महायुद्धापासून ते अलीकडच्या कारगिल युद्धापर्यंत प्राणाची बाजी लावली आहे. गावच्या चारही रस्त्यांना जाग येते ती तरुणांच्या रपेटीने. टाकळी येथील पाच–पाच पिढ्यांनी देशाच्या संरक्षणासाठी बलिदान दिलेले आहे, म्हणूनच हे गाव 'सैनिक टाकळी' म्हणून संपूर्ण भारतात ओळखले जाते. आज भारतातील असे एकही लष्करी तळ नाही की, जिथे या गावातील जवानाने सेवा बजावलेली नाही. सैनिक टाकळीत सामुदायिक भवनाच्या शेजारी ‘अमर जवान’ स्मारक असून; या स्मारकावर युद्धात कामी आलेल्या १८ जवानांची नावे कोरलेली आहेत.

स्वातंत्र्यासाठी अनेकांनी दिलेले बलिदान, संघर्ष आणि लढा आपल्याला कधीही विसरून चालणार नाही. आपल्याला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी मोठी किंमत मोजावी लागली आहे. त्यासाठी अनेक सैनिकांनी हौतात्म्य पत्करले आहे. सैनिक टाकळीतील तरुणांनी देशसेवेची परंपरा सातत्याने जोपासली आहे. २०२३ हे वर्ष भारतीय स्वातंत्र्याचे ७५ वे वर्ष, म्हणजेच अमृत महोत्सवी वर्ष आहे. भारताच्या स्वातंत्र्यासाठी ज्ञात–अज्ञात लाखो वीरांनी जीवाची आहुती देऊन आपणास स्वातंत्र्य मिळवून दिले. या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी अजूनही अनेक कुटुंबे आपल्या घरातील एकतरी सदस्याला भारतीय लष्करात दाखल करण्याची परंपरा राखून आहेत. याचेच एक उत्तम उदाहरण म्हणजे कोल्हापूर जिल्ह्यातील सैनिक टाकळी.



विस्तीर्ण कृष्णेने तिन्ही बाजूंनी कवेत घेतलेले, कोल्हापूरपासून ५० किलोमीटर अंतरावर शिरोळ तालुक्यात असलेले हे ‘सैनिक टाकळी’ गाव. दरवर्षीच्या पुराने या गावची माती सुपीक होत राहते, तशीच येथील माणसाची मनेही सुपीक आहेत. मन आणि मेंदूही बळकट. येथील विशाल हृदयाच्या अनेक शूरांनी पहिल्या महायुद्धापासून ते अलीकडच्या कारगील युद्धापर्यंत प्राणाची बाजी लावली आहे. ‘सैनिक टाकळी’ ही बिरूदावली गाव केवळ अभिमानाने मिरवते असे नाही तर त्या बिरुदावलीला आजही जागत आले आहे. निवृत्त झालेले असले तरी येथील जिंदादिल जवानांमध्ये देशभक्ती ओतप्रोत भरलेली आहे. सहा हजार लोकसंख्या असलेल्या या गावातील जवळपास प्रत्येक परिवाराने एक तरी सैनिक देशाला सुपूर्त केला आहे.

कोल्हापूर जिल्हा संपन्न. त्यातला शिरोळ तालुकाही सुपीक. ऊस, केळी, कसदार फळभाज्या आणि भाजीपाला पिकविणारा हा तालुका. कर्नाटक राज्याच्या सीमेवर वसलेलया सैनिक टाकळी गावात जवळपास सोळाशे एकराची मुबलक जमीन आहे. पैकी अकराशे एकर बागायत जमीन आहे. गावात जवळपास सातशे माजी सैनिक असून, महिन्याला कोटींची उलाढाल होते. एवढे आर्थिक स्थैर्य असतानाही येथील तरूण सैन्यात भरती होण्यासाठी आसुसलेला असतो. गावातील निवृत्त जवान ही येथील तरुणांची खरी प्रेरणा आहे. गावातली सैनिकी परंपरा सुरू झाली ती पहिल्या महायुद्धापासून. त्या काळात गावोगावी देशी, मर्दानी खेळ खेळले जात. लाठीकाठी, तलवारबाजी, दांडपट्टा अशी सर्वांगानं मेहनत होणाऱ्या खेळाने अंगात रग येते. सैनिक टाकळीतही लाठीकाठी, लेझीम, दांडपट्टा खेळून घाम

गाळणारे, पीळदार बाहूंचे तरुण रोज सराव करीत. पहिल्या महायुद्धाची परिस्थिती निर्माण झाली तेव्हा गावोगावचे तगडे जवान सैन्यात भरती करण्यात आले. त्यात सैनिक टाकळीतील ६० जवान हेरून त्यांना सैन्यात भरती केले. त्यासाठी तत्कालीन सरकारने जमिनीही दिल्या. आजही या जमिनी 'लष्करी पट्टा' म्हणून ओळखल्या जातात. युद्धसमाप्तीनंतर काहीजण सहा वर्षे पायपीट करत निव्वळ ग्रह, ताऱ्यांच्या सोबतीने दिशेचा अंदाज घेत गावी परतले. एवढ्या वर्षांत आपल्या माणसाचा थांगपत्ता लागला नाही म्हणून काही कुटुंबीयांनी त्यांचे पिंडदानही केले होते. मात्र काही जिगरबाज महिलांनी पतीचे प्रेत पाहिल्याशिवाय कुंकू पुसणार नाही, अशी शपथ घेतली होती ती शेवटपर्यंत पाळली. ज्याच्या नावाने पिंडदान केले तो माणूसही काही वर्षांनी परतला. मेलेल्या माणसाबद्दल अनेक दंतकथा पसरत राहतात. या गावाने मात्र त्या प्रत्यक्ष अनुभवल्या. दुसऱ्या महायुद्धात लढताना हवालदार तुकाराम केशव पाटील यांचे शीर धडापासून वेगळे झाले होते. तरीही शीर नसलेले हे धड दीर्घकाळ गोळीबार करीत राहिले. शत्रूच्या काळजात धडकी भरविणारा हा प्रसंग होता.

ब्रिटिश सरकारने हवालदार तुकाराम केशव पाटील यांच्या कामगिरीची दखल घेत त्यांचा मरणोत्तर पुरस्कार देऊन सन्मान केला. त्यांच्या मातोश्रींना त्यावेळी रोख सात हजारांचे बक्षीस दिले आणि पेन्शनही सुरू केले. 'युद्ध्स्य कथा रम्या' असे म्हटले जाते. मात्र युद्धभूमीवरील समरप्रसंगात साक्षात मृत्यू समोर असतानाही त्याला भिडायचे कसे, याचा वस्तुपाठच येथील नव्या पिढीला आजी–माजी सैनिकांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शन आणि अनुभवातून मिळतो.

ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी रत्नाप्पाण्णा कुंभार यांनी पंचगंगा साखर कारखान्यासाठी उभारलेल्या इरिगेशन स्किमच्या उद्घाटनासाठी १९६८ मध्ये जनरल पी. पी. कुमारमंगलम् आले होते. तेव्हा कुमारमंगलम् यांची टाकळी भेटही नियोजिली होती. त्यांच्या स्वागतासाठी सर्व निवृत्त जवान लष्करी गणवेषात उपस्थित होते. एवढ्या मोठ्या संख्येने एकत्र आलेले जवान पाहून, "इतके निवृत्त जवान कुठून आले?' असे त्यांनी विचारले. तेव्हा ते सर्वजण याच गावचे असल्याचे सांगितल्यानंतर कुमारमंगलम् यांनी कौतुकाने "अरे, ये टाकळी नहीं, ये तो सैनिक टाकळी हैं!" असे गौरवोद्गार काढले. त्या दिवसापासून गावाला 'सैनिक टाकळी' या नावाने ओळखले जाऊ लागले. कागदोपत्री आणि सरकार दरबारी जी प्रक्रिया होणे आवश्यक आहे, ती होत राहील. मात्र, आता लोकांनीच 'सैनिक टाकळी' हे नाव वापरण्यास सुरूवात केली आहे. यामुळे हे नाव वापरण्यासाठी आणखी कुणाच्या परवानगीची गरज नाही.

केवळ हजार–दीड हजार कुटुंबे असलेल्या या गावाने देशाला दीड हजाराहून अधिक सैनिक दिले आहेत. इसवी सन १९१४ ते २०२१ अशी १०७ वर्षे देशाला १४ सैनिक देणारे सैनिक टाकळी येथील सुभेदार कुटुंब महाराष्ट्रातील वैशिष्टयपूर्ण कुटुंब ठरले. सैनिक टाकळी येथील रावसाहेब मालोजीराव जाधव हे पहिल्या महायुद्धात सहभागी झाले होते. ते टाकळी गावातील पहिले सुभेदार होते. त्यांच्या पश्चात या कुटुंबाला 'सुभेदार' या टोपण नावाने ओळखले जाऊ लागले. दुसऱ्या महायुद्धामध्ये त्यांचा मुलगा ज्ञानदेव रावसाहेब जाधव यांनी सहभाग घेतला होता. ते सुभेदार मेजर पदावर कार्यरत होते. त्यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या विचारांनी प्रभावित होऊन इंग्रजांच्या नोकरीचा त्याग केला आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी आझाद हिंद सेनेत प्रवेश केला. त्यांचा मुलगा ऑ. कॅप्टन बापूराव जाधव यांनी इसवी सन १९६५ व इसवी सन १९७१ च्या भारत–पाक युद्धात भाग घेतला. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी गावातील आजी–माजी सैनिकांना एकत्र करून 'माजी सैनिक कल्याण मंडळा'ची स्थापना केली. पहिले व दुसरे महायुद्ध, स्वातंत्र्योत्तर काळात चीन व पाकिस्तानविरोधात झालेली युद्धे आणि श्रीलंकेत पाठविलेल्या शांतीसेनेच्या 'लिट्टे'शी झालेल्या संघर्षात आणि आजपर्यंत झालेल्या वेगवेगळ्या युद्धांत शहीद झालेल्या सैनिक टाकळी गावच्या १८ जवानांचे प्रेरणादायी 'अमर जवान' स्मारक येथे उभारण्यात आले आहे.

इसवी सन २००७ साली सैनिक समाज कल्याण मंडळाने या स्मारकाची स्थापना केली. गावातील वीरमाता, वीरपत्नी व आजी–माजी सैनिकांच्या समस्या शासनासमोर मांडल्या. त्यांचा मुलगा भरतकुमार बापूराव जाधव बॉम्बे इंजिनिअरींग ग्रुपमध्ये नाईक पदावर होता. त्यांनी इसवी सन १९८४ पासून इसवी सन २००१ पर्यंत देशसेवा केली. सध्या सुभेदार कुटुंबाच्या पाचव्या पिढीतील अक्षय भरतकुमार जाधव हा देखील इसवी सन २०१६ पासून सिपाई पदावर भरती झाला आहे. इसवी सन १९१४ पासून इसवी सन २०२१ अशी १०७ वर्षे देशाला १४ सैनिक देणारे हे महाराष्ट्रातील एक अत्यंत उल्लेखनीय कुटुंब ठरले आहे. त्याबद्दल सुभेदार कुटुंबाचे प्रतिधिनी म्हणून नाईक भरतकुमार बापूराव जाधव यांना 'महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्डस्' चे मुख्य संपादक डॉ. सुनील दादा पाटील यांनी शाल, श्रीफळ, पदक, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

महाराष्ट्रातील सैनिक टाकळी हे गाव पहिल्या महायुद्धाच्या काळापासून सशस्त्र सैन्यदलात सैनिक पाठवीत आहे. सैनिक टाकळीची ही 'सैनिकी परंपरा' मनोहर महादेव भोसले या तरुणाने सचित्र पुस्तकरुपाने संकलित केली असून ती सचित्र माहिती कवितासागर प्रकाशन, जयसिंगपूर यांच्या माध्यमातून 'सैनिकी परंपरेचे गाव – सैनिक टाकळी' या शीर्षकाने ग्रंथरूपाने दोन भागांत प्रकाशित झाली आहे. सैनिक टाकळी गाव वसले कसे याचा मागोवा घेत त्यात टाकळीचे मूळ लखोजी जाधवांच्या घराण्यापर्यंत असल्याचे संदर्भ उपलब्ध केले आहेत. हा शोध घेताना हेळव्यांच्या दप्तराचासुद्धा आधार घेतला गेला आहे.







**For Special Benefit of Baltimore Marathi Mandal Members**
**Notary and Realtor Services** Provided (with UPS Store #6852 in Wintergreen Plaza) at convenient locations: Columbia, Rockville and Burtonsville, MD.

All services are provided with proceeds donated to Baltimore Marathi Mandal. Our services include a number of functions that our members need with reference to Indian functions, such Power of Attorney documents, Apostille services, etc. Contact at above locations with E-mail and/or Phone to check the convenient time.

**Gajanan M. Sabnis**
10001 Windstream Drive
Columbia, MD 21044
TEL: 240 988 6050
E-mail: gmsabnis@gmail.com

**Mahadeo Wayal**
14713 Harvest Lane
Silver Spring, MD 20905
Tel: 240 706 1488
E-mail: mwayal@gmail.com